# - भगवद्गीता सर्वांसाठी -

श्रीमद्भगवद्गीता हा अद्भुत ग्रंथ केवळ ज्ञानी, विद्वान पंडितांचा आहे हा गैरसमज प्रथम डोक्यातून काढून टाकायला हवा. ही गीता अगदी सर्वसामान्य लोकांसाठी आहे. मुळात तो केवळ तत्वज्ञानाचा ग्रंथ नाही तर तो आचरणाचा ग्रंथ आहे. गीता ही सर्वांना सामावून घेणारी, आपलेसे करणारी आहे. माणूस म्हणून जन्मलेल्या प्रत्येकासाठी—मग तो कोणत्याही धर्म, पंथ, संप्रदाय, देश किंवा वर्णाचा असो—मार्गदर्शक ठरते.

हजारो वर्षे उलटून गेली तरी आजही ती नित्यनूतन आहे. गीता हा खरं तर रत्नाकर आहे. या सागरात जितक्या वेळा डुबक्या माराल तितक्या वेळी नवनवीन रत्ने हाताला लागतात. आयुष्यभर गीतेचा अभ्यास करणाऱ्यांना सुद्धा प्रत्येक वेळी गीतेचा एक नवीनच पैलू सापडत जातो. आणि अवर्णनीय आनंद देऊन जातो.

'भगवद्गीता हा हिंदूंचा ग्रंथ आहे' हा आणखी एक गैरसमज आहे. तो सर्वधर्मीयांचा आधार आहे. गीतेत अनेकदा 'स्वधर्म' असा उल्लेख येतो, मात्र तिथे त्याचा अर्थ 'स्वकर्म' असाच आहे. गीतेत कुठेही कर्मकांड सांगितलेले नाही. परंतु प्रत्येक कर्म समरस होऊन उत्तमप्रकारे आणि निस्वार्थीपणे करायला सांगितले आहे. आणि हीच गीतेची विशेषता आहे.

गीतेच्या विषयांमध्ये वैविध्य आहे. प्रत्येक अध्यायात एक योग सांगितला आहे. मात्र गीतेच्या उपासकांना निरनिराळे मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य निश्चितपणे आहे. त्यात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, ध्यानयोग अशी विविधता असली तरी कुठेही विरोधाभास नाही. कारण शेवटी सर्व मार्ग एकाच परमात्म्यापर्यंत जाऊन पोहोचतात. रस्ते वेगळे असले तरी अंतिम गन्तव्यस्थान एकच आहे. स्वामी विवेकानंदांच्या मते तर गीता म्हणजे विविधरंगी फुलांचा आकर्षक गुच्छ आहे.

गीतेत ७०० श्लोक आहेत आणि १८ अध्यायांमध्ये ते विभागले आहेत. कुरुक्षेत्रावर जेव्हा धर्मयुद्ध सुरु होते अशा वेळी घडलेला हा भगवान श्रीकृष्ण व धनुर्धारी अर्जुन यांच्यातील संवाद आहे. खरंतर पाहता अर्जुनाला युद्धासाठी

प्रवृत्त करणे हे गीतोपदेशाचे मुख्य उद्दिष्ट्य जरी असले तरी तो एकमेव हेतू नाही. मानव म्हणून जन्मलेल्या प्रत्येकाला स्वधर्माचे भान आणून देणे हा खरं तर गीतेचा मुख्य हेतू आहे. आणि खरोखर गीतेचे पठण किंवा अभ्यास पुन:पुन: व्हायला लागल्यावर तर स्वधर्माची, स्वकर्माची जाणीव स्पष्टपणे होतेच होते आणि हेच गीतेचे फलित आहे.

ही भगवद्गीता बोध करणारी असली तरी त्यात फक्त उपदेश नाही तर संवादामुळे त्याला नाट्यमयता आली आहे. आणि अर्जुनसुद्धा साधासुधा श्रोता नाही तर विचक्षण श्रोता असल्यामुळे आणि जणू आपल्याच मनातले प्रश्न तो विचारत असल्यामुळे उत्सुकता टिकून राहते. कुठेही कंटाळा किंवा शीण येत नाही. यातील मुख्य वक्ते जरी कृष्ण व अर्जुन असले तरी या नाट्यमय प्रसंगांचे निवेदन संजयने केले आहे. संजय हा सर्वशास्त्रसंपन्न, विद्वान आणि मुख्य म्हणजे निपक्षपाती आहे. आणि म्हणूनच महर्षी वेदव्यासांनी त्याला दिव्यदृष्टी दिली. याव्यतिरिक्त अंध धृतराष्ट्राने एकच प्रश्न विचारला आहे. त्याच प्रश्नापासून गीतेच्या संवादाला सुरुवात होते. आणि जिज्ञासु अभ्यासक त्या नाट्यमय प्रसंगात गुंतत जातात. साधकांना त्यातील विविध पैलू खुणावत असतात तर सर्वसामान्य जनांना देखील त्यात अमूल्य असे काहीतरी सापडत जाते.

प्रस्थानत्रयीमधील उपनिषदे आणि ब्रह्मसूत्रे जाणून घेण्यासाठी कुशाग्र बुद्धि व गुरुंची कृपा हवी. मात्र त्यात सांगितलेले तत्त्वज्ञानच अधिक सोपे, सुलभ होऊन गीतारूपाने आपल्यासमोर आले आहे. संस्कृतचे जुजबी ज्ञान असणाऱ्या सर्वसामान्य अभ्यासकाला सुद्धा गीतेचा अर्थ थोडाफार तरी समजतो. कारण खरोखर गीतेची भाषा अतिशय सोपी व सुमधुर आहे. कृष्ण व अर्जुनासाठी वापरलेली विशेषणे, संबोधने, क्रियापदे या सर्व रचनेतून नेमकेपणा समोर येतो. अर्थात ही सर्व व्यासांची प्रतिभा आहे. आणि अशी गीता आपल्यासमोर आहे तशीच्या तशीच संवादरूपाने घडली नसावी कदाचित! म० व्यासांनी तो संवाद संकलित

करुन, त्यात उपनिषदातील तत्त्वज्ञान सुबोध करुन त्याची भर घातली असावी आणि नंतर विषयानुसार त्यांचे १८ भाग केले. हे सर्व कार्य ज्या दिवशी पूर्ण झाले तो दिवस होता मार्गशीर्ष शुद्ध एकादशीचा म्हणजे मोक्षदा एकादशी! याच दिवसाला आपण 'गीताजयंती' म्हणतो.

गीता हे सर्व शास्त्रांमधील श्रेष्ठ शास्त्र तर आहेच परंतु ती सर्वश्रेष्ठ कलादेखील आहे. म्हणजे शास्त्र हे सिद्धांत मांडण्याचे काम करते आणि कला तेच सिद्धांत आचरणात आणायला शिकवते. ज्ञान (Knowledge) वेगळे आणि त्याचे उपायोजन (Implementation) वेगळे! मात्र या दोन्ही आघाड्यांवर गीता महत्त्वाची कामगिरी बजावते. सिद्धांत नेहमीच गहन असतात. मात्र त्यांना कलेची जोड दिली की त्यात सोपेपणा येतो, सहजता येते. खरं पाहिलं तर ही गीता म्हणजे ब्रह्मविद्या आहे. परंतु काव्यरूपाने ती आपल्यापर्यंत आल्यामुळे त्यातील गूढ तत्त्वज्ञान सुलभ होते आणि ते आचरणात आणणे सहज शक्य होते.

शास्त्रानुकूल वर्तन करणाऱ्या व्यक्तीला आपोआपच परमेश्वरी बळ प्राप्त होते. या गीतामाऊलीचे बोट एकदा धरले की पुढचा मार्ग आपोआप दिसायला लागतो. माणसाचे जीवन दुःख, संकटांनी भरलेले आहे याविषयी दुमत नाही. परंतु संकटात बळ देणारी, दुःखात फुंकर घालणारी आणि आनंदाच्या प्रसंगी आनंद द्विगुणित करणारी ही गीताच आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या निमित्ताने हा गीतोपदेश संपूर्ण मानवजातीला केला आहे. भौतिक व आध्यात्मिक अशा सर्व समस्यांचे निराकरण यात स्पष्टपणे केले आहे. आपल्या संघर्षमय जीवनात कधीतरी अंधारात चटकन दिवा लागावा असा एखादा श्लोक आठवतो आणि संकटाचे आपोआप निराकरण होऊन जाते. पुढचा मार्ग सुलभ होऊन जातो.

भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानाचा अभ्यास ही फार पुढची गोष्ट आहे. मात्र भगवद्गीतेच्या केवळ स्पष्ट उच्चारणानेही व्यक्तीवर अनेक सुपरिणाम दिसून येतात. सर्वप्रथम म्हणजे

वाणी शुद्ध होते. अनेक कठीण उच्चारण करता करता जिव्हेचे सामर्थ्य वाढते. स्मरणशक्ती सुधारते. त्यातून आत्मविश्वास वाढतो. हे झाले बाह्य परिणाम! गीता पठणामुळे शरीरातील अंतस्त्रावी ग्रंथींवर योग्य तो परिणाम होऊन पचनक्रिया उत्तम होते. चांगली भूक लागते. गीता म्हणत असताना आपोआप प्राणायाम होऊन श्वासावर नियंत्रण येते. आश्चर्यकारक रीतीने श्वसनाचे आजार नियंत्रणात येतात. पठण करणाऱ्याबरोबरच नुसते श्रवण करणाऱ्याला देखील एका अद्भुत शांतीचा अनुभव येतो. वृत्तींमध्ये पालट होतो. वाईट विचार आपोआप लोप पावतात. केवळ चांगले विचार मनात घोळू लागतात. क्षमाशीलता वाढते. क्रोधावर नियंत्रण येते. भूतमात्रांविषयी प्रेम जिव्हाळा वाटू लागतो. भूक व निद्रा या नैसर्गिक गोष्टींवर ताबा मिळवता येतो. इतकेच नाही, तर ज्या ठिकाणी वारंवार गीतापठण सुरु असते अशी वास्तू सुध्दा मंत्रोच्चारणातील स्पंदनामुळे पवित्र होते.

अनेक अभ्यासक संपूर्ण गीता मुखोद्गत करतात. नित्य पठण करतात. परंतु हा केवळ एक टप्पा आहे. गीता नुसती कंठस्थ करून चालणार नाही, तर ती हृदयस्थ व्हायला हवी. त्यातील प्रत्येक विचारावर, शब्दावर चिंतन, मनन घडायला हवे. अनेक विद्वानांनी गीतेतील तत्त्वज्ञानावर भाष्य केले आहे. आपले विचार मांडले आहेत. अभ्यास करत असताना कदाचित त्यामध्ये विरोधाभासही आढळेल. परंतु प्रत्यक्ष गीतेमध्ये कुठेही विरोधाभास नाही. परस्परांना छेद देणारे विचार नाहीत. कर्मकांडाचे कुठेही समर्थन केलेले नाही. उलट निर्लेप मनाने निष्काम कर्मयोग कसा आचरणात आणता येईल याचे बहुमोल मार्गदर्शन गीता आपल्याला करते. ही भगवद्गीता अंधारातून प्रकाशाकडे नेते. अज्ञान्याला शहाणा बनवते. मुखदुर्बळाला बोलके बनवते. पांगळ्याला डोंगर ओलांडून जाण्याचे सामर्थ्य देते. अशा अभ्यासकाला साहजिकच आयुष्यातील लहान मोठ्या संकटांचा त्रास जाणवत नाही.

म्हणजे संकटे येत नाहीत असे नाही. प्रारब्धानुसार ती येतच राहतात. ती अटळ आहेत. मात्र त्यांच्यावर मात करण्याचे सामर्थ्य गीतोपासकाला निश्चितपणे मिळते. अवघड प्रसंगी योग्य निर्णय घेण्याची सारासार विवेकबुद्धी त्याला लाभते. बहुतेक सर्वच निर्णय योग्य ठरतात.

मात्र त्यासाठी केवळ गीता पठण पुरेसे नाही. पुस्तकी पांडित्याने गीतेतील शब्दांचा अर्थ, वाच्यार्थ किंवा अगदी लक्ष्यार्थ देखील समजेल. परंतु ही गीता सर्वार्थाने आपल्यात मुरण्यासाठी आपल्या बुद्धीचा स्तर उंचावायला हवा. बुद्धीकडून मेधा, मेधेकडून प्रज्ञा आणि प्रज्ञेकडून प्रतिभे पर्यंत प्रवास व्हायला हवा. आणि हे सामर्थ्य वाढवण्याचे कामही करते गीतामाताच! तिला वंदन करून आपण तिचेच आशीर्वाद मागूया!

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्॥


फोन. ०२०-२५३८६९६५
९३७३३६६६११

माधवी रघुबीर जोशी
डी-८८, बुडलँड
गांधी भवनजवळ
कोथरुड, पुणे ४११०३८.